महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. पीओएस-०२१८/प्र.क्र.१२९/पोल-३, दि. ०८/०७/२०२५.

**विषय** :- पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या आस्थापनेवर नवीन एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे निर्माण करण्यास, त्याकरिता पदनिर्मिती व त्याअनुषंगाने येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. पीओएस-०२१८/प्र.क्र.१२९/पोल-३, दि. ०८/०७/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०७०८१८०७५१९७२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 14-07-2025 21:25:47

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
कार्यासन अधिकारी, का. क्र. २६-अ.

प्रत,
अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य ,मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य ,मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (पुर्नरचना).

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या आस्थापनेवर नवीन एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे निर्माण करण्यास, त्याकरिता पदनिर्मिती व त्यानुषंगाने येणा-या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पीओएस-०२१८/प्र.क्र.१२९/पोल-३**
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : ०८ जुलै, २०२५.

**संदर्भ** :-

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/सातपूर अंबड पोठा/नाशिक शहर/३६८/२०१६, दि.०४.०९.२०२४.

२) उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक १३.०५.२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे दि.२२.०५.२०२५ रोजीचे कार्यवृत्त.

**प्रस्तावना :-**

नाशिक जिल्ह्याचे क्षेत्रफळ १५,५३० चौ.कि.मी. असून सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या सुमारे १४,८६,०५३ लाख इतकी होती. गेल्या काही वर्षात नाशिक जिल्ह्यात औद्योगिकरण व शहरीकरणामध्ये बरीच वाढ झाली असल्याने लोकसंख्या व गुन्हेगारी यामध्ये सातत्याने वाढ होत आहे. परिणामी कायदा व सुव्यवस्था राखणेकामी जिल्हा पोलीस यंत्रणेवर अधिकाधिक ताण पडत आहे. सन १९८२ मध्ये नाशिक, सातपूर व नाशिक रोड या नगरपालिकेचे एकत्रीकरण करुन नाशिक महानगरपालिका स्थापन करण्यात आली आहे. महानगरपालिका क्षेत्रात औद्योगिकरण, लोकसंख्येमध्ये झालेली वाढ व अनेक लहान- मोठे उद्योगधंदे, इंडिया सिक्युरिटी प्रेस, आर्टिलरी सेंटर कार्यरत आहेत. नाशिक शहराचे झपाट्याने होणारे शहरीकरण, लोकवस्ती, लोकसंख्या, औद्योगिकरण यामुळे गुन्ह्यांच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. उपरोक्त कारणास्तव पोलीस महासंचालक (नि. व. स), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ रोजींच्या पत्राद्वारे पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या आस्थापनेवर पोलीस ठाणे सातपूर व पोलीस ठाणे अंबड या दोन पोलीस ठाणे मधील परिसराचे विभाजन करुन नवीन एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या आस्थापनेवरील सध्या कार्यरत सातपूर पोलीस ठाणे व अंबड पोलीस ठाणे यांचे विभाजन करुन नवीन एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. तसेच उक्त नमूद पोलीस ठाण्यांकरिता या शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट-अ "** मध्ये नमूद केलेली विविध संवर्गातील एकूण १८१ पदे (नियमित) निर्माण करण्यास व ०२ सफाई कामगार ही पदे बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास, व त्याकरिता रु.१९,१६,८९,७०४/- (रुपये एकोणीस कोटी सोळा लाख एकोणनव्वद हजार सातशे चार फक्त) इतक्या आवर्ती व रु.५५,४१,०००/- (रु. पंचावन्न लाख एकेचाळीस हजार फक्त) इतक्या अनावर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

३. उक्त पोलीस ठाण्याकरीता ०२ पदे "सफाई कामगार" या पदाच्या सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेताना वित्त विभागाच्या दि. २७/०४/२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींचे पालन करण्यात यावे.

४. सदर एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यांकरिता येणारा आवर्ती व अनावर्ती खर्च उपलब्ध मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. उपरोक्त पोलीस ठाणेकरिता हद्दनिश्चितीचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाने शासनास सादर करावा.

६. उक्त शासन निर्णय हा संदर्भीय क्र.२ येथील मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.२२.०५.२०२५ रोजी झालेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०७०८१८०७५१९७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2025.07.08 18:08:50 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रत,**

मा.मुख्यमंत्री (गृह) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक.
उप सचिव(पोल ३),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
निवड नस्ती, पोल-३.

**शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : पीओएस-०२१८/प्र.क्र.१२९/पोल-३**
**दिनांक : ०८ जुलै, २०२५ चे सहपत्र.**

**"परिशिष्ट-अ"**

पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचे आस्थापनेवर नवीन एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याकरिता नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या पदांचा तपशील

**अ) नियमित पदे :-**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | मंजूर पदसंख्या | आवर्ती खर्च | अनावर्ती खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोलीस निरीक्षक | S-१८-(रू.४९१०० ते रू.१५५८००) | ०४ | रु.१९,१६,८९,७०४/- | रु.५५,४१,०००/- |
| २. | सहायक पोलीस निरीक्षक | S-१५-(रू.४१८०० ते रू.१३२३००) | ०६ | | |
| ३. | पोलीस उप निरीक्षक | S-१४-(रू.३८६०० ते रू.१२२८००) | १५ | | |
| ४. | सहायक पोलीस उप निरीक्षक | S-१०-(रू.२९२०० ते रू.९२३००) | १४ | | |
| ५. | पोलीस हवालदार | S-९-(रू.२६४०० ते रू.८३६००)+ विशेष वेतन रु.७५०/- | ४९ | | |
| ६. | पोलीस शिपाई | S-७-(रू.२१७०० ते रू.६९१००)+ विशेष वेतन रु.७५०/- | ९३ | | |
| **एकूण पदे** | | | **१८१** | **रु.१९,१६,८९,७०४/-** | **रु.५५,४१,०००/-** |

**ब) बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा:-**

| अ.क्र. | सेवा | मनुष्यबळ |
|---|---|---|
| १ | बहुउद्देशिय अकुशल गट-ड कर्मचारी (सफाई कामगार) | ०२ |